# प्रकरण - २

## प्रकरण दुसरे

# सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे शैक्षणिक कार्य

### प्रस्तावना

माणसाचे जीवन यशस्वी होण्यासाठी ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे शिक्षण ही अधिकपटीने महत्त्वाची गरज आहे. शिक्षणामुळेही प्रत्येक माणसाला आपला सर्वांगीण विकास करण्यास आधारकाठी आहे. मानवी जीवन सुखी, समृद्ध बनवायचे असेल तर प्रथम प्राधान्य शिक्षणाला दिले जाते. सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात माणसाचा विकास झाला तरी त्याचा नैतिकदृष्ट्या विकास होण्यासाठी सांस्कृतिक विकासातील शिक्षण हा एक महत्त्वाचा संस्कार मानला जातो. विश्वातील प्रत्येक घटकाचे ज्ञान प्राप्त करता येते. व्यावहारिक जीवन जगताना नेहमीच शिक्षणाचा आधार मिळतो. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

कोणत्याही व्यक्तीचे जीवन हे संस्कारावर आधारित असते. मुळात सर्वच मानव सारखेच, पण ज्या व्यक्तीवर चांगले संस्कार लहान वयातच होणे गरजेचे आहे. त्यासाठी घरातील वडिलधाऱ्या व्यक्तीचे जितके महत्त्वाचे स्थान आहे त्यापेक्षा जास्त महत्त्व शिक्षकाला आहे. विशेषत: प्राथमिक शिक्षकांची भूमिका फार महत्त्वाची असते. कारण लहान मने मातीचा गोळा असतात. ज्या पद्धतीने मातीला योग्य आकार देवून त्यापासून चांगली मूर्ती बनविता येते त्याच पद्धतीने ह्या लहान मुलांना वळण देईल तसे संस्कार घडत असतात. कोणत्याही यशस्वी व्यक्तीचे चरित्र पाहिल्यास त्याच्यावर लहानपणी ज्या शिक्षकाने संस्कार केले त्यांचा फार मोठा प्रभाव असतो. याठिकाणी शिक्षकांचे कार्य शाळेपुरतेच मर्यादित न धरता व्यापक अर्थाने त्याचा विचार केला तर गुरु-शिष्य हे नाते फार महत्त्वाचे असते. गुरुचा प्रभाव शिष्यावर पडलेला असतो. छत्रपती शिवाजीराजे हे आदर्श राजे आहेत. त्यांच्यावर संस्कार करणारे गुर दादोजी कोंडदेव व जीजामाता यांचा प्रभाव होता असे दिसून येते. म्हणजे कोणत्याही व्यक्तीला चांगले शिक्षण मिळाले की ती व्यक्ती प्रभावी ठरते. त्यांचे कार्य यशस्वी ठरते. सर्वच व्यक्तींना चांगले संस्कार, चांगले शिक्षण मिळाले की ती व्यक्ती आदर्श होतेच असे नाही. त्यासाठी

काही अंगभूत गुणही आवश्यक आहेत. ह्या अगंभूत गुणांना योग्य वळण देण्याचे काम शिक्षक, गुरु करत असतात.

माणसाच्या अंगामध्ये जिद्द, धाडस, कष्ट करण्याची तयारी आणि बुद्धीचातुर्य असले की त्याच्या हातून इतिहासाची निर्मिती होत असते. याचे अलिकडच्या काळातील उदाहरण म्हणजे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील होय. शिक्षण हे सुसंस्काराचे केंद्र बनावे, उद्याचा संवेदनशील सुजाण नागरिक घडवण्याचे काम शिक्षणच करु शकते. या तत्त्वाला अनुसरुनच त्यांनी सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला. सामान्यांच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी शहरात जावे लागत असे म्हणून सहकाराच्या विकासाच्या कल्पनेबरोबर शिक्षणाच्या विकासाचे स्वप्नही त्यांनी पाहिले आणि ते प्रत्यक्षात उतरविले. अतिशय बिकट परिस्थितीत त्यांनी हे कार्य केले.

सर्वसामान्य व्यक्तिच्या वाट्याला येणारा एक प्रसंग महर्षिंच्याही वाट्याला आला. परंतु हा प्रसंग महर्षिंच्या जीवनामध्ये तसेच समाजामध्ये एक नाट्यमय क्रांती घडवून गेला. इयत्ता सातवीत असताना शाळेची फी गरिबीमुळे भरता न आल्यामुळे शाळा अर्ध्यावरच सोडावी लागली. मनामध्ये फक्त एकच संकल्प मी दुर्लक्षित, गरीबासाठी शाळा काढणार! शाळेच्या उंबऱ्यातून बाहेर पडले तेच मुळी ज्ञानाच्या पणतीने इतर असंख्य पणत्या पेटविण्याच्या इर्षेने.

या सर्व जगात ज्ञानासारखी पवित्र आणि उपयुक्त अन्य शक्ती नाही. कोणत्याही राष्ट्राची धारणा त्या राष्ट्रात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जावर अवलंबून असते. शिक्षण हेच व्यक्तिविकासाचे व राष्ट्रविकासाचे मूळ आहे. म्हणून शिक्षण प्रसाराचे लोण समाजाचे सर्व थरात पोहोचविण्याचे कार्य करणे आवश्यक ठरते. या उद्देशाने सहकारमहर्षि यांनी रंजल्या गांजल्या, दिनदुबळ्या, गरीब, श्रमजीवी व मागासवर्गीय उपेक्षित समाज शिक्षणाशिवाय पुढे येणार नाही हे जाणून व आर्थिक अडचणीमुळे स्वतःचे शिक्षण अर्धवट सोडावे लागल्याची जाणीव ठेवून जाती, धर्म, वर्ग निरपेक्ष बहुजन समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी शाळा काढण्याचा निश्चय त्यांनी केला होता.

## जाहीर सत्कार व वसतिगृहाची निर्मिती

"भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे व स्वातंत्र्यसंग्रामात केलेल्या कार्याबद्दल शंकरराव मोहिते-पाटील, बाबासाहेब माने-पाटील व सदुभाऊ माने-पाटील या तीन्ही बंधूंचा अकलूजकरांतर्फे २६-१०-४७ रोजी अकलूजच्या विजय चौकात भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता. पुण्याचे खासदार श्री. शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली व सोलापूरचे खासदार श्री. तुळशीदास जाधव यांच्या हस्ते तीन बंधूंचा भव्य सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे तुळशीदास जाधव यांनी शिक्षणाचे महत्त्व व आपले कर्तव्य यावर अत्यंत मार्मिक व उद्‌बोधक भाषण करून शिक्षणसंस्था काढावी व त्यासाठी सढळ हाताने देणग्या देण्याचे आवाहन केल्यानंतर मा. शंकरराव मोहिते-पाटील यांनी त्यांना अर्पण केलेल्या रुपये ५०१ मध्ये स्वत:चे रुपये ५०१ घालून निघणाऱ्या शिक्षणसंस्थेस रुपये १००२ ची देणगी दिल्याचे जाहीर केले व लगेच त्याच सत्कार समारंभात सुमारे ६ हजार रुपयांच्या देणग्या मिळाल्या. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला मिळालेला विजय, विजयादशमी दिवशी झालेला सत्कार समारंभ व शंकरराव मोहिते-पाटील यांच्या थोरल्या मुलाचे नावही विजयच असल्याने हा त्रिवेणी संगम साधून निघणाऱ्या वसतिगृहाचे नाव 'विजय' विद्यार्थी वसतिगृह, अकलूज असे ठेवण्याचे सर्वानुमते ठरले. पहिल्या वर्षासाठी अध्यक्ष श्री. सर्जेराव देवकर आण्णा, उपाध्यक्ष शंकरराव मोहिते-पाटील व व्यवस्थापक म्हणून श्री. रघुनाथ माने गुरुजी यांची व इतर १० सभासदांचे कार्यकारी मंडळ निवडण्यात आले व वसतिगृहास सुरुवात प्रत्यक्षात भाऊराव दांगे यांच्या माडीवर दि. ११-६-४८ ला प्रथम सहा विद्यार्थ्यांवर करण्यात आली."[1]

अशा प्रकारे शंकरराव मोहिते-पाटील यांनी आपणाला मिळालेल्या रुपये ५०१ च्या थैलीचा सदुपयोग केलेला दिसून येतो. त्यांनी सर्वप्रथम गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रथम राहण्याची सोय झाली पाहिजे हे ओळखून त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याप्रमाणे विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृह स्थापन केले. कारण राहण्याची सोय असेल तरच विद्यार्थी शाळा शिकू शकेल असे त्यांना वाटत होते.

**अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाची निर्मिती**

"भारतातील नव्या पिढीला व विशेषतः सोलापूर जिल्हयातील लोकांना विशेषत: शेतकरी आणि कामकरी यांना तसेच शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या हरिजनादी वर्गांना मुक्तहस्ताने प्राथमिक, दुय्यम, विश्वविद्यालयीन, वाङ्मयीन, शास्त्रीय, शारीरिक, औद्योगिक आणि शेतीविषयक सर्वांगीण शिक्षण देणेकरीता अकलूज व इतर सोईचे ठिकाणी वसतिगृहे, विद्यालये, प्राथमिक शाळा व प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा काढून साक्षरता प्रसार करणे आणि स्वतंत्र भारतातील विद्यार्थी, खेड्यातील जनतेच्या जीवनात सुधारणा घडवून त्यांची सांस्कृतिक व नैतिक उंची वाढवतील अशा तऱ्हेचे आदर्श नागरीक निर्माण करणे या ध्येयाने प्रेरित होऊन दिनांक २३ जून १९४८ रोजी 'शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज या नावाची शिक्षणसंस्था रीतसर रजिस्टर करण्यात आली."[२]

शंकररावजींचे शिक्षण बेताचेच झाले होते. मनात शिक्षणाविषयी खूप मोठा आदर होता. त्यांना नेहमी वाटत असे की, बहुजन ग्रामीण समाज शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. प्रत्येकजपण सुशिक्षित झाला पाहिजे. त्याला उदयाचा यशस्वी नागरिक म्हणून ताठ मानेने जगता आले पाहिजे. या सोलापूर जिल्हयातील कोणीही, कुठेही गेला तरी त्याला कोणतीही अडचण शिक्षणाअभावी येऊ नये हा शिक्षणाबद्दलचा विचार सदैव शंकररावजींच्या मनात घोळत असे. म्हणूनच त्यांनी शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज या संस्थेची स्थापना केलेली दिसून येते.

"या शिक्षणसंस्थेचा कल्पवृक्ष नव्या जोमाने बहरु लागला. ग्रामीण जनतेची आर्थिक उन्नती होण्यासाठी शिक्षण हे झोपडीपर्यंत जाऊन पोहचले पाहिजे असे शंकररावजींना नेहमी वाटत असे. हा उद्देश डोळ्यापुढे ठेवूनच शंकररावजींनी शिक्षणाच्या कामाला गती दिली. समाजकार्याला वाहून घेतलेल्या शंकररावजींनी समाजाची खरी प्रगती शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही याची पक्की खूणगाठ मनाशी बांधलेली होती. म्हणूनच त्यांनी १९४८ साली 'विजय' वसतिगृहाची स्थापना करुन शिक्षणसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली." प्रथम विद्यार्थ्यांची राहण्याची सोय त्यांनी केली. गोरगरिबांच्या, माळ्या-साळ्यांच्या, कुणब्या-कबाड्यांच्या मुलांसाठी शिक्षण देणारी एखादी संस्था ह्या भागात उभी

राहिल्याशिवाय ह्या भागाचा विकास होणे शक्य नाही. शिक्षण हाच खरा विकासाचा पाया आहे आणि ही गोष्ट डोळ्यासमोर ठेवून शंकररावांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून अकलूज शिक्षण मंडळाची स्थापना करायची ठरवली होती.

कै. शंकरराव मोहिते-पाटील यांनी विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केली. शिक्षणक्षेत्रात बिकट परिस्थितीमध्ये १ मार्च १९४९ रोजी स्थापन करण्यात आलेली "शिक्षण प्रसारक मंडळ" ही संस्था आज भक्कम पायावर उभी राहून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. गरीब विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण उपलब्ध व्हावे, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांना त्यांच्या पाल्यांसाठी आर्थिक ताण पडू नये या दृष्टिकोनातून अशा मुलांना विनामूल्य अगर अल्प खर्चामध्ये वसतिगृहाची स्थापना केली. सुशिक्षित समाजाशिवाय देश प्रगतीची वाटचाल करु शकत नाही, देशाची सर्वांगीण उन्नती करावयाची असेल तर शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील पिढी सुशिक्षित करण्यासाठी आवश्यक तेथे सर्वांगीण शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत या ध्येयाने प्रेरित होऊन अनेक अडचणीवर धैर्याने मात करुन शैक्षणिकदृष्टया त्या भागाम्ध्ये परिवर्तन केले आहे. या संस्थेच्या अनेक विविध शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत. पूर्वप्राथमिक शाळेपासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत या संस्थेने शिक्षणाची सोय केलेली आहे. या सर्व संस्थामध्ये ग्रामीण भागातील सुमारे तीस हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. "तेवो सदा ज्ञानमय प्रदीप" हे 'शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज' या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे.

"शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज या संस्थेला नुकतीच ५५ वर्षे पूर्ण झाली आहेत. संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला आहे. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दि. ४ जानेवारी ते ७ जानेवारी १९९९ या कालावधीत आयोजित केलेल्या आनंदयात्रेची 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये नोंद झालेली आहे. तसेच संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने एक लाख रुपये व आदर्श शिक्षणसंस्था पुरस्कार देऊन गौरव केला आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांच्या रुपाने संस्थेने अनेक सुवर्णमुद्रा घडवलेल्या आहेत. या संस्थेच्या शाखामधून अनेक विद्यार्थी समाजकारण,



SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

राजकारण, व्यापार, शिक्षण, कायदा, सुरक्षा व्यवस्था व अन्य क्षेत्रामध्ये या संस्थेचे नाव उज्वल करीत आहेत."[3]

आज मागे वळून पाहताना सहकारमहर्षिंची तीव्रतेने आठवण येते. त्यांनी लावलेले हे रोपटे आज बहरलेले आहे. सध्या संस्थेच्या खालीलप्रमाणे विविध शैक्षणिक शाखा व विभाग कार्यरत आहेत.

पूर्वप्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये, अध्यापक विद्यालये, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अखिल भारतीय गांधर्व संगित महाविद्यालय, कृषि महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य माहितो व तंत्रज्ञान अभ्यासक्रम, शिवण कर्तन विभाग, व्यवसाय शिक्षण वर्ग, मुला-मुलींची वसतिगृहे, सौंदर्यशास्त्र अभ्यासक्रम, गृहविज्ञान महिला विद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय.

कै. शंकररावजींच्या पश्चात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री व विद्यमान ग्रामीण विकास व पर्यटनमंत्री मा. ना. विजयसिंहजी (दादा) मोहिते-पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व शिक्षण प्रसारक मंडळाचे कर्तव्यदक्ष अध्यक्ष मा. जयसिंग उर्फ बाळदादा मोहिते-पाटील यांच्या शिस्तप्रिय नियोजनाद्वारे शिक्षण प्रसारक मंडळाचा ज्ञानदीप अधिकाधिक तेजोमय होऊन शिक्षणाची तेजस्वी किरणे सोलापूर, पुणे व रायगड जिल्हयातील ग्रामीण व नागरी भागात प्रकाशमय होत आहेत. तसेच शिक्षकांचे कल्याणार्थ त्यांच्या सहकारी पतसंस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी कर्मचारी पतसंस्था शैक्षणिक क्षेत्रात निर्माण करुन शिक्षकांसाठी सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना मा. विजयदादांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे उच्च शिक्षणासाठी "जवाहरलाल विद्यार्थी वसतिगृहाची" स्थापना केली. तसेच १९७२-७३ मधील दुष्काळामध्ये विद्यार्थ्यांसाठी अन्नछत्रे काढलेली होती. केवळ फीचे पैसे भरायला नसल्यामुळे इयत्ता सातवीतून त्यांना शाळा सोडावी लागली. या गोष्टीची खंत त्यांना नेहमी वाटत होती. शिक्षणाशिवाय माणसाचा उद्धार नाही

हे त्यांना मनोमन पटले होते. १९४८ साली त्यांनी स्थापन केलेल्या या शिक्षणसंस्थेने आज विराट स्वरुप धारण केले आहे.

एकदा सदाशिवराव माने विद्यालयाच्या व्यासपीठावरुन शंकररावजींनी या शिक्षणसंस्थेच्या स्थापनेमागील उद्दिष्ट बोलून दाखविले होते. ते म्हणाले, 'या शिक्षणसंस्थेत शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी जेव्हा या भारत देशाचा पंतप्रधान होईल तेव्हाच माझे शिक्षणसंस्थेबद्दलचे उराशी बाळगलेले स्वप्न साकार होईल.' या त्यांच्या विचारावरुन बहुजन समाजाविषयी असलेली व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांविषयी असलेली त्यांची आस्था दिसून येते.

**विद्यालयाची निर्मिती**

"विजय वसतिगृहाच्या स्थापनेनंतर शंकररावजी गप्प बसले नाहीत. विजय वसतिगृहात राहणाऱ्या तसेच अकलूजमध्ये राहणाऱ्या परिसरातील विद्यार्थ्यांनी हायस्कूलचे शिक्षण घेण्यासारखी अकलूजपासून दोन-तीन किमी अंतरावर असलेल्या माळीनगर येथील मॉडेल हायस्कूलमध्ये जावे लागत असे. हे शंकररावजींनी पाहिले व मनाशी दृढ निश्चय केला की अकलूजमध्येच हायस्कूल सुरु करावयाचे. त्यासाठी त्यांनी अकलूजमध्ये एक जाहीरसभा घेतली. त्या सभेत शंकररावजींनी हायस्कूल सुरु करण्याविषयीची कल्पना लोकांसमोर मांडली. या त्यांच्या कल्पनेला जनतेकडून चांगलाच प्रतिसाद मिळाला."[४]

तसेच सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा भव्य सत्कार ह. भ. प. श्री. संत गाडगे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झाला व श्री. भाऊराव पाटील यांना १ लाख रुपयांची थैली व नवी कोरी मोटार अर्पण करण्यात आली. त्या समारंभास माननीय शंकरराव मोहिते-पाटील यांचे सांगणेवरुन श्री. रघुनाथ माने हजर होते व अकलूज येथे श्री. शंकरराव मोहिते-पाटील यांनी सर्व जातीधर्मासाठी विद्यार्थी वसतिगृह चालू केले आहे व अकलूज येथे त्यांना विद्यालय काढावयाचे आहे असे रघुनाथ माने गुरुजींनी आण्णांना सांगताच त्यांना अतिशय आनंद झाला व त्यांना माझेकडे घेवून या असे आण्णांनी रघुनाथ माने गुरुजींना सांगितले. त्यामुळे शंकरराव मोहिते-पाटील व रघुनाथ

माने गुरुजी हे दोघेजण अकलूजवरुन सायकलने सातारला जाऊन आण्णांना भेटले. तेव्हा भाऊराव आण्णांनी शंकररावांना कडकडून मिठीच मारली व पाठीवर थाप टाकून म्हणाले, "तुमच्यासारखे कर्तबगार शिक्षणकार्यात उतरल्याशिवाय जनतेचे शिक्षण होणार नाही, देशाची प्रगती होणार नाही. तुम्ही अकलूजला विद्यालय लवकरच काढा. तुम्हाला जरुर ती सर्व मदत मी स्वत: व आमची रयत शिक्षण संस्था करेल."[५] असा विश्वास दिला. तेव्हा हे दोघेजण अकलूजला परत आलेवर सिनेमा थिएटरच्या मागील बाजूस श्री. विठ्ठल शेटे यांचे जागेत दिनांक २४-१२-४८ रोजी पहिली सभा घेतली आहे. दिनांक २५-१२-४८ रोजी विद्यालयाची देणगी गोळा करणेचे काम सुरु करुन सुमारे ८,५०० रुपये देणगी जमा केली.

श्री. जिवराजभाई भांबूडकर यांची जागा भाड्याने घेऊन इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत एकाचवेळी हायस्केल सुरु केले. पहिल्या दिवशी १०० विद्यार्थी जमले. विद्यालयाचे पहिले शिक्षक श्री. वा. रा. मराठे व पहिले मुख्याध्यापक म्हणून पंढरपूरचे श्री. जी. जी. नेणे यांची नेमणूक करुन अकलूजचे इतिहासात नवीनच शैक्षणिक पर्व सुरु झाले. १ मार्च १९४९ रोजी 'शिक्षण प्रसारक मंडळ' च्या पहिल्या हायस्कूलची स्थापना अकलूजमध्ये झाली. "प्रथम या हायस्कूलचे नामकरण 'शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय' असे करण्यात आले होते. थोड्याचे अवधीत शंकररावजींच्या कुटुंबावर एक दुर्देवी प्रसंग ओढवला. तो प्रसंग म्हणजे त्यांचे धाकटे बंधू सदाशिवराव माने-पाटील यांचे अकाली निधन झाले. तेव्हा या हायस्कूलच्या स्थापनेसाठी सदाशिवराव माने-पाटील यांनी जे कष्ट घेतले होते ते ध्यानी घेवून तसेच त्यांच्या कार्यापासून अकलूजच्या जनतेला सतत स्फूर्ती मिळावी या उदात्त हेतूने 'शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय' या ऐवजी 'सदाशिवराव माने विद्यालय' असे नामकरण १९६१ मध्ये करण्यात आले."[६]

अशारितीने शंकरराव मोहिते-पाटील यांनी विद्यालयाची गरज ओळखून दूरदृष्टीद्वारे विद्यालय स्थापन केले व लोकांचे सहकार्य मिळविण्यात ते यशस्वी झाले. त्यांनी विद्यालयाची सुरुवात करीत असताना लोकांचे उत्स्फूर्तपणे सहकाय कसे मिळवावे याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले होते. त्यामुळेच लोकांनी आपल्या घरच्या जागा विद्यालयाला देवून टाकल्या होत्या. त्यानंतर "श्री भाऊसाहेब हंगे यांची जागा विद्यार्थ्यांना

अपुरी पडल्यामुळे नदीकाठची श्री. कृष्णात जामदार यांची नदीकाठची जागा वसतिगृहासाठी भाड्याने घेतली व पुढे काही दिवसांनी तीही जागा अपुरी पडू लागल्याने श्री. शंकरराव मोहिते-पाटील यांनी अकलूज येथील राहता वाडा विद्यार्थ्यांसाठी मोकळा करुन दिला व ते स्वतः १९५४ साली रानात झोपडी बांधून तेथे राहण्यास गेले. त्यांचे वाड्यात बरेच दिवस विद्यार्थी राहत होते."[७]

### वसतिगृहाचे इमारत बांधकाम

"वसतिगृह इमारतीसाठी सरकारने स. नं. ३४५ मधील ११ एकर जागा दिनांक २५-४-१९५४ रोजी आरक्षित करुन संस्थेच्या ताब्यात दिली व संस्थेने त्या जागी तात्पुरत्या झोपड्या, पत्रे व कौलांच्या खोल्या तयार करुन दिनांक १३-११-१९५४ रोजी तात्पुरत्या खोल्यात स्वतःच्या मालकीच्या जागेत वसतिगृह आणले. दि. १६-६-१९४९ ते दि. १३-११-१९५४ म्हणजे ६ वर्षे ५ महिन्यांनी भाडोत्री जागेतून स्वतःच्या जागेत आणले. नंतर एक लाखाचे इस्टिमेट मंजूर करुन ३० खोल्यांचे वसतिगृह इमारत बांधण्याचे ठरवून दि. २६-२-१९६१ ला उपगृहमंत्री ना. यशवंतराव मोहिते व सौ. जाईबाई मोहिते यांचे हस्ते कोनशिला बसविली. सदर इमारतीस सरकारकडून २५ हजार रुपये कर्ज व ५० हजार रुपये ग्रँट मिळाली व बाकीची रक्कम देणगीच्या रुपाने जमा करुन इमारत पूर्ण केली. दि. २३-२-१९६८ ला तिचे उद्घाटन अध्यक्ष मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक व प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पद्मभूषण ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक सांगलीचे वसंतदादा पाटील यांच्या हस्ते झाले."[८]

केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित झालेलया शंकरराव यांनी शिक्षणाचा ध्यास घेतला व आपल्या सामाजिक व सार्वजनिक जीवनाची सुरुवात अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ ही शिक्षण संस्था चालू केली. महात्मा जोतिबा फुले व राजर्षि शाहू महाराज यांच्यासारखे ते एक दूरदृष्टीचे नेते होते. महात्मा जोतिबा फुले यांनी १०० वर्षापूर्वी "शेतकऱ्याचा आसुड" या पुस्तकामध्ये शिक्षणाची माहिती सांगितली आहे ते म्हणतात, "विदेयविना मती गेली, मती विना गती गेली, गती विना निती गेली, निती विना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले, इतके अनर्थ अविदयेने केले".



UNIVERSITY KOLHAPUR

याची प्रचिती म्हणजेच आज मराठीपासून इंग्रजी माध्यमापर्यंतचे सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय या परिसरात झाली आहे. यावरुन शंकरराव मोहिते-पाटील यांची दूरदृष्टी आपणाला दिसून येते.

शिक्षणाबद्दल शंकरराव मोहिते-पाटील यांना अत्यंत प्रेम होते. त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते. त्यामुळेच की काय पण तरुणांनी, मुलांनी अधिकाधिक शिकावे अशी त्यांची मनोधारणा होती. आपला माणूस प्रत्येक नव्या क्षेत्रात गेला पाहिजे आणि तिथे तो कमी पडता कामा नये असा त्यांचा आग्रह होता. त्यातूनच शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली.

### शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर, अकलूज

सरकारच्या सन १९७६-७७ च्या धोरणानुसार संस्थेला १० च्या वर माध्यमिक शाळा काढण्यास परवानगी नाकारण्यात आल्याने सहकारमहर्षि शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांच्या प्रेरणेने दिनांक २३-२-१९७७ रोजी शिक्षण प्रसारक मंडळास संलग्न अशी शिवरत्न शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. तिचे अध्यक्षपद मा. श्री. राजसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांना देण्यात आले. कै. शंकरराव मोहिते-पाटील यांच्या मनात या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास व्हावा अशी इच्छा होती.

### शेती व शेती उत्पन्न

अकलूज, लवंग, माणकी, ता. माळशिरस, खांडवी, ता. बार्शी व सराटी, लुगेवाडी ता. इंदापूर येथे संस्थेच्या मालकीच्या १२८ एकर शेतजमिनी आहेत. त्याचा उपयोग संस्थेच्या शिक्षणविस्तार कार्यासाठी केला जातो.

### इमारत फंड जमविण्याबाबत

सरकारने हायस्कूलसाठी स. नं. ३४५ पैकी ६ एकर २३ गुंठे जमिन उपलब्ध करुन दिली होती. दि. २१-६-१९५८ ला जमीन मिळाल्यानंतर इमारतीचा कोनशिला समारंभ मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते दि. १९-११-१९५९ ला करण्याचे ठरले होते. त्यावेळी इमारत फंडासाठी वर्गणी गोळा करावी अशी विनंती रघुनथ रामचंद्र माने गुरुजी

यांनी शंकरराव मोहिते-पाटील यांना केली होती. परंतु त्यांनी ती नाकारली. माने गुरुजी यांना त्यावेळी फार वाईट वाटले व अनायसे आलेली संधी दवडल्याने दुःखही झाले. माने गुरुजींना शंकररव मोहिते-पाटील म्हणाले की, "मंत्र्यांच्या सहाय्याने अगर दुसऱ्यांच्या स्हाय्याने देणगी गोळा करणे शंकरराव मोहिते-पाटील यांना पसंत नव्हते. आपण आपले स्वतःच्या हिमतीवर देणगी गोळा करु तुम्ही त्याची काळजी करु नका."[१०]

काही दिवसांनी २८-२-१९६६ रोजी पुण्याच्या लिला गांधी आणि पार्टीचा प्रयोग विद्यालय इमारत फंडासाठी केला व २-३ दिवस रात्रंदिवस घरोघर व वस्त्यांवर फिरुन ९ लाख ८७ हजार रुपयांची देणगी जमा केली व त्या रक्कमेतून अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या वरच्या दुसऱ्या मजल्याचे काम साखर कारखान्याचे इंजिनिअरमार्फत पूर्ण करुन घेतले. यावरुन कोणतेही काम करताना दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतः मेहनत करुन करावे हे शिक्षण लोकांना त्यांचेपासून मिळाले.

**श्रमदानाने रस्ता तयार करुन घेतला**

अकलूज-खुडुस रस्ता म्हणजे पूर्वी तेथे पाणकणिस वाढलेले होते. दलदलीचा भाग, खाचखळगे असल्याने माणसाला पायी जाणे अतयंत जिकीरीचे होते. तेथे सायकली व इतर वाहने जाणे शक्य नव्हते. जवळच बोर्डींगचे विद्यार्थी रहात असल्याने पाण्याचे डबक्यामुळे मलेरियाचा त्रास व्हायचा. हे शंकरराव मोहिते-पाटील यांचे लक्षात येताच तो रस्ता श्रमदानाने करुन घ्यायचा असे त्यांनी ठरविले व लगेच कामाला सुरवातही केली. ते स्वतः सकाळी ७ वाजलेपासून संध्याकाळी ८ वाजेपर्यंत सर्वांबरोबर व दुसऱ्यांकडूनही काम करुन घ्यायचे. सुमारे दोन महिने मालट्रकने दगडगोटे, मुरुम वाहतूक करुन रस्त्यावर टाकायचे व वसतिगृहामधील विद्यार्थी, हायस्कूलचे व मराठी शाळेचे विद्यार्थी, हमाल, शेतकरी, नोकरवर्ग, व्यापारी मित्र या सर्वांच्या श्रमदानाने नवीनच रस्ता तयार करुन घेतला व स्वतः राबून तयार केला. दि. ३१-१२-१९५५ ला सोलापूर जिल्हयाचे कलेक्टर मे. जी. एल. शेर यांचे हस्ते त्या रस्त्याचे उद्घाटन केले. त्यावेळी १०-१२ जार लोक समारंभात हजर होते."[११] शंकरराव मोहिते-पाटील यांनी एखादी गोष्ट मनावर घेतली की ती पूर्ण होईपर्यंत आटोकाट प्रयत्न करुन ते काम पूर्ण करणारच असा त्यांचा बाणा होता.

हायस्कूलचे विद्यार्थी वेळापूरचे श्री. बाबुराव गुलाबराव माने-देशमुख व श्री. एस. एस. देशमुख यांना शंकरराव मोहिते-पाटील यांचे सांगणेवरुन दि. १२-६-१९५७ रोजी कॉलेज शिक्षणासाठी सातारला कर्मवीर भाऊराव पाटील यांचे संस्थेत घेवून गेले व भाऊराव आण्णा यांची समक्ष गाठ घेवून व छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य श्री. के. एस. उनवणे यांना भेटून वरील दोघांना सदर कॉलेजात दाखल करुन घेण्यास सांगितले व त्या दोघांनी सातारा येथे कॉलेजचे शिक्षण पूर्ण केले. श्री. बा. गु. माने सहकारी साखर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून तर श्री. एस. एस. देशमुख हे सदाशिवराव माने विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून काम पहात आहेत. यावरुन योग्य माणसांची अचूक पारख करण्याची कला मोहितेसाहेबांकडे असल्याचे दिसून येते.

**अकलूज कॉलेजची निर्मिती**

सन १९६७ पर्यंत अकलूज येथे वसतिगृह व विद्यालय, माणकी येथे वसतिगृह व विद्यालय, करुबावी येथे वसतिगृह व विद्यालय, फोंडशिरस व पिंपळनेर येथे विद्यालये चालू होती. अकलूज येथील वसतिगृहाच्या व विद्यालयाच्या इमारती पूर्ण झाल्या होत्या. त्या इमारतीत वसतिगृह व विद्यालय चालू होते. माळशिरस तालुक्यात प्राथमिक व दुय्यम शिक्षणाची सोय झाली होती. पण उच्च शिक्षणाची सोय करणे अत्यंत जरुरीचे व महत्त्वाचे होते असे शंकरराव मोहिते-पाटील यांना सारखे वाटत होते. त्यादृष्टीने प्रयत्न सुरु झाले. अकलूज येथे आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेजसाठी अर्ज केले गेले. दि. २६-७-१९६६ ला शिवाजी विद्यापीठाचे श्री. जी. के. पाटील, श्री. एस. एल. शिरोडकर, श्री. पी. एस. जावडेकर यांचे त्रिसदस्य कमिशर घेऊन पुरेसे विद्यार्थी मिळतील का, पुरेशी जागा वगैरेची सर्व पाहणी करुन कॉलेजला परवानगी मिळाली व १९६७ पासून अकलूज येथे कॉलेज विद्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर नवीन इमारतीत सुरु केले व पहिले प्राचार्य म्हणून श्री. पी. के. देशमुख यांची निवड झाली."[१२]

शंकरराव मोहिते-पाटील दूरदृष्टीचे नेते होते. त्यांना विद्यालयाची सोय केल्यानंतर महाविद्यालयाची गरज भासू लागली व त्यांनी लगेच महाविद्यालयाचीही सोय झाली पाहिजे म्हणून प्रयत्न सुरु केले व अखेर त्यांनी महाविद्यालय सुरु केले. कारण गोरगरीब मुले

महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी बाहेर जाऊ शकत नव्हती. म्हणून त्यांनी महाविद्यालय काढले.

**पब्लिक स्कूलची निर्मिती**

आमदार शंकररावांचा ५१ वा वाढदिवस व गौरव समारंभ होता. त्यादिवशी दि. १४-१-१९६९ रोजी अकलूज येथे मोठ्या प्रमाणात माननीय जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष वसंतदादा पाटील यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्यावेळी आमदार शंकरराव मोहिते-पाटील यांना मानपत्र व १,२५,५५१ रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. त्यामध्ये शंकरराव मोहिते-पाटील यांनी स्वतःचे ११ हजार रुपये घालून त्या रकमेतून यशवंतनगर (अकलूज) येथे पब्लिक स्कूल काढणेसाठी ही रक्कम देणगी म्हणून दिली. त्या रक्कमेतून पब्लिक स्कूल काढण्यात आले.[१३]

**सांस्कृतिक कार्य**

क्रीडा क्षेत्राकडे, संगीत कलेकडेही त्यांनी लक्ष पुरविले. अकलूजच्या मुलांचा वाद्यवृंद (ऑकेस्ट्रा) महाराष्ट्रभर गाजला. शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट स्थापन करुन त्याद्वारे सर्वांगिण विकासासाठी कितीतरी कामे केली. शिवपार्वती मंदिर, कारखान्याच्या जागेत त्यांनी निर्माण केलेली वनश्री, ती सुंदर टेकडी, टेकड्यांवरील बगीचा, मनाला प्रसन्न करणारे शिवपार्वती मंदिर, तो पॅगोडा, शिवछत्रपतींचा पुतळा, सभागृह, जलाशय पाहिले की वाटायचे या माणसाला दृष्टी आहे, कल्पकता, योजकता आहे. कष्ट आणि आनंद या दोन्हींची आवड आहे. या साध्या माणसाच्या अफाट कर्तृत्वाकडे शहरी लोकांनी आणि शहरी वृत्तपत्रांनी लक्ष देवू नये याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

काकासाहेबांनी सांस्कृतिक बाजूही सांभाळलेली आहे हे यावरुन दिसून येते. त्यांच्या संस्थेशी निगडीत असणारा मुलांचा वाद्यवृंद संपूर्ण महाराष्ट्रभर गाजला आहे. त्यांना सांस्कृतिक कलेची फार आवड होती. त्यांनी अनेक मंदिरे बांधली. ते अतिशय श्रध्दाळू होते.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

**शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट**

या भागातील सहकारी साखर कारखान्यांच्या सभासदांनी उत्स्फूर्तपणे दिलेल्या देणगीतून ही संस्था स्थापन करण्यात आली आहे. या भागातील विविध प्रकारच्या विकासकार्यासाठी ट्रस्टने महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. १९७२ साली झालेल्या भीषण दुष्काळामध्ये या ट्रस्टमार्फत सोलापूर जिल्हयातील ११ व पुणे जिल्हयातील इंदूपर तालुका यासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे १२ वॉटर टँकरद्वारे त्या तालुक्यातील लोकांना पिण्याचे पाणी पुरवण्यात आले. या ट्रस्टच्या विद्यमाने ग्रीनफिंगर्स स्कूल ही शाळा संपूर्णतया वसतिगृहयुक्त सहशैक्षणिक व इंग्रजी माध्यमातून सुरु करण्यात आली आहे.[१४]

**ग्रीन फिंगर्स स्कूल**

"सहकारमहर्षि कै. शंकरराव मोहिते-पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता इंग्रजी माध्यमातील ग्रीनफिंगर्स स्कूल सन १९७५ मध्ये शिवपार्वती ट्रस्टच्या माध्यमातून स्थापन केले. सदर स्कूलमध्ये १०० टक्के रेसिडेंशियल स्कूल असून महाराष्ट्रातील व इतर राज्यातील बहुतांश मुले या स्कूलमध्ये ॲडमिशन घेतात. बालवाडीपासून १० वी पर्यंत येथे विद्यार्थी शिक्षण घेत असतात. विद्यार्थ्यांना कपडे, वह्या, पुस्तके, निवास व भोजन व्यवस्था तसेच औषधोपचार अल्प दरामध्ये करण्यात येतो."[१५]

त्याचप्रमाणे वरील रेसिडेंशियल स्कूल असल्याने परिसरातील इतर विद्यार्थ्यांना अनिवासी इंग्रजी माध्यमातील शाळेची गरज भासल्यनंतर शिवरत्न शिक्षणसंस्थेच्यावतीने शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश मेडियन स्कूलची स्थापना सन १९८८ मध्ये मा. ना. श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी केली. सदर इंग्लिश मेडियम स्कूलमध्ये इयत्ता १ ली पासून १० वी पर्यंत विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

अशाप्रकारे इंग्रजी शिकणे ही काळाची गरज आहे हे ओळखून काकांनी इंग्रजीची शाळा काढली व ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांनासुध्दा इंग्रजी शिकण्यासाठी त्यांनी सोय केलेली दिसून येते.

**प्रताप क्रीडा मंडळ**

नवयुवकांमध्ये कलोपासना व खेळाची आवड निर्माण व्हावी यासाठी तरुणांचे नेते मा. श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांनी प्रताप क्रीडा मंडळाची स्थापना केली. सध्या २०० हून अधिक तरुण या संस्थेचे सभासद आहेत. जिल्हा व तालुका पातळीवर हुतूतू, खो-खो, व्हॉलीबॉल, आट्यापाट्या, सायकलिंग, धावणे, लेझीम, कुस्ती स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच क्रीडामंडळाचेवतीने वर्षभर विविध प्रकारचे २६ उपक्रम महिला, मुले, पुरुष यांचेसाठी राबविण्यात येतात. तसेच प्रौढ शिक्षण वर्ग चालू असून महिला विभागामार्फतही विविध योजना राबविण्यात येतात. अशाप्रकारे १९७७ साली शंकरराव मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेले प्रताप क्रीडा मंडळ कार्यरत आहे. तसेच प्रताप क्रीडा मंडळाचेवतीने २६ जानेवारी १९९३ रोजी नवी दिल्ली येथे गेलेल्या लेझीम पथकास प्रथम क्रमांक मिळालेला आहे.

"फेब्रुवारी १९८२ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मा. श्री. जयसिंग शंकरराव मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती युवक महोत्सव साजरा करण्यात आला. त्यामध्ये ४०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे अखिल भारतीय पातळीवरील महाविद्यालयीन ग्रामीण क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या व त्यामध्ये भारतातील सर्व राज्यातील २००० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होते. तसेच फेब्रुवारी-मार्च, १९८६ मध्ये महाराज्य राज्य रौप्यमहोत्सव क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या. सन १९९० मध्ये अखिल भारतीय बास्केटबॉल, हॅन्डबॉल, टेबल टेनिस स्पर्धा आयोजित केल्या होत्या."[१६]

काकासाहेबांना क्रीडा क्षेत्राची पाहिल्यापासून आवड होती. ग्रामीण विद्यार्थ्यांना प्रताप क्रीडा मंडळाच्या माध्यमातून आपल्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा हा त्यामागे त्यांचा प्रमुख उद्देश होता.

**तांत्रिक प्रशाला**

"यशवंत सहकारी साखर कारखान्यात नोकरीसाठी येणारा तरुण तांत्रिक ज्ञानाने परिपूर्ण व्हावा म्हणून व स्थानिक विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण उपलब्ध करुन देणे व त्यांना परिसरातील वेगवेगळ्या उद्योगधंदयात नोकरी देण्याच्या उद्देशाने साखर कारखान्याच्या सक्रीय सहकार्याने टेक्निकल हायस्कूल १९६५ मध्ये शंकरराव मोहिते-पाटील यांनी सुरु केले."[१७]

**मार्च १९५१ ते मार्च १९९४ अखेर अंतिम परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी संख्या**

आजपर्यंत संस्थेतील विद्यार्थी माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदविका व पदवीच्या परीक्षा उत्तीर्ण होऊन जीवनाच्या विविध क्षेत्रात काम करीत आहेत. संस्थेने सर्व शाखांना शिक्षण खात्याच्या, विद्यापीठ नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. संस्थेच्या विविध शाखांना महाराष्ट्र शासनाची व केंद्रशासनाची त्यांच्या विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रोत्साहन, अनेक पारितोषिके व अनुदाने प्राप्त झालेली आहेत.[१८]

| अ. नं. | परीक्षा | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | एस. एस. सी. | ९५६५ |
| २ | एच. एस. सी. | ५९३८ |
| ३ | बी. ए. | ११८६ |
| ४ | बी. कॉम. | ८१० |
| ५ | बी. एस्सी. | ३७४ |
| ६ | डी. एड्. | ४२० |
| ७ | बी. एड्. | २८३ |
| ८ | बी. पी. एड्. | ३१५ |
| ९ | शिवण कर्तन वर्ग | १९९ |

| | | |
|---|---|---|
| १० | ट्रायसेम विभाग | २९३ |
| ११ | दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन पदविका | ७५ |
| १२ | माळी पालन प्रशिक्षण | ८ |
| १३ | कुक्कुटपालन प्रशिक्षण | २७ |
| १४ | संगणक अभ्यासक्रम | ९३ |
| १५ | अखिल भारतीय गांधर्व संगीत परीक्षा | २५९ |
| १६ | बालवाडी प्रशिक्षण | २०३ |

**सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान (ट्रस्ट)**

"प्रतिष्ठानची स्थापना दिनांक १६-५-१९८१ रोजी करण्यात आली आहे. सदर प्रतिष्ठानच्यावतीने मौजे टणू येथे स्वत:चे मालकीची जमिन खरेदी करण्यात आली असून त्या शेतीचे उत्पादनावर स्वामी सर्वानंद डायग्नोस्टिक सेंटर, अकलूज येथे चालू केले असून त्यामध्ये १२५० रुग्णांची तपासणी अल्प दरामध्ये करण्यात आली आहे. तसेच ब्लड बँकेची स्थापना करण्यात येवून आजतागायत जवळजवळ १० हजार बाटल्या रक्त गोळा करण्यात आलेले आहे.[१९] त्याचप्रमाणे प्रतिष्ठानच्यावतीने माळशिरस तालुक्यातील पश्चिम भागातील विद्यार्थ्यांकरिता विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय स्थापन करण्यात आले आहे.

"या भागामध्ये शैक्षणिक संस्था तसेच सहकारी संस्थांचे जाळे पसरले असून ग्रामीण भागातील पूर्वप्राथमिक शाळेपासून ते विद्यापीठ पातळीवरील शिक्षण घेणाऱ्या अत्यंत प्रज्ञावंत परंतु गरीब असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, वैयक्तिक मदतीची सोय करणे इत्यादी लोकोपयोगी कार्यासाठी सतत कार्यरत असते.

अशाप्रकारे शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठानचे कार्य विधायकवृत्तीचे असल्याचे दिसून येते. या प्रतिष्ठानचा उद्देश असा आहे की, सर्वसामान्यांना जेवढ्या प्रमाणात मदत करता येईल त्या प्रमाणात मदत करणे होय.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे अमृतमहोत्सवी जयंती वर्ष १९९३**

संस्थेचे संस्थापक सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांना विनम्र अभिवादन करुन त्यांची ७५ वी जयंती अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून विविध उपक्रम राबवून साजरे करण्यात आले. त्याचा आढावा खालीलप्रमाणे आहे.[२०]

१. वृक्षारोप - दि. ४ जुलै १९९३ रोजी संस्थेच्या सर्व शाखांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्यासाठी संस्थेमार्फत २५ ते ३० हजार विविध प्रकारची रोपे पुरविण्यात आली आहेत.

२. निबंध स्पर्धा - दि. १६ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट १९९३ या कालावधीत इयत्ता १ ली ते महाविद्यालयीन स्तरावर एकूण ६ गटात निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण १८२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी एकूण रु. १३६२ ची रोख बक्षीसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली आहेत.

३. वक्तृत्व स्पर्धा - दि. ६ सप्टेंबर ते ९ सप्टेंबर १९९३ या कालावधीत इयत्ता १ ली ते महाविद्यालयीन स्तरावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये १९१ स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेतील स्पर्धकांना रु. १३६२ ची रोख बक्षीसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली.

४. चित्रकला स्पर्धा - या स्पर्धा ४ सप्टेंबर १९९३ रोजी बालवाडी ते महाविद्यालयीन स्तरावर ६ गटात घेण्यात आल्या. या स्पर्धेत ३३७५ स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धेसाठी रु. ३०९४ ची रोख रक्कमेची बक्षीसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली.

५. समूहगान स्पर्धा - या स्पर्धा १२ ऑक्टोबर १९९३ रोजी इयत्ता १ ली ते महाविद्यालयीन स्तरावर ५ गटात घेण्यात आल्या. यात संस्थेच्या ३४ शाखांनी भाग घेतला. या स्पर्धेतील विजयी संघांना रु. १३८५ ची रोख बक्षीसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली आहेत.

६. ग्रामसफाई - दि. ५ डिसेंबर १९९३ रोजी संस्थेच्या सर्व शाखांनी आपले गावात ग्रामसफाई कार्यक्रमांतर्गत एक प्रभातफेरी काढून गावातील सार्वजनिक ठिकाणी रस्ते, चौक इ. सामुदायिक सफाई ग्रामपंचायतीच्या सहाय्याने केली.

७. व्याख्यानमाला - दि. ६ डिसेंबर ते २० डिसेंबर १९९३ या कालावधीत व्याख्यानमालेचा कार्यक्रम राबविण्यात आला. अकलूज, वेळापूर, पिंपळनेर, कोथरुड, पुणे, नातेपुते, सदाशिवनगर, शंकरनगर या ठिकाणी निरनिराळ्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची विविध विषयावर १७ व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

८. रक्तदान - या कार्यक्रमांतर्गत अकलूज, वाघोली, बोरगांव येथे अनुक्रमे दि. १२-६-१९९३, ३-१०-१९९३ व १५-८-१९९३ रोजी रक्तदान शिबीरे घेण्यात आली. यामध्ये ३१३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

९. प्रौढ शिक्षण - प्रौढ शिक्षण कार्यक्रमांतर्गत संस्थेच्या २९ शाखांनी भाग घेतला असून यात २८८५ विद्यार्थी/विद्यार्थिनीनी आपापल्या गावातील वस्तीतील लोकांना साक्षर करण्यासाठी वर्ग उघडले होते.

१०. सेवक कल्याण निधी - संस्थेच्या सेवकांचे कल्याणासाठी कायमस्वरुपी निधी उभारलेला आहे. सध्या असा निधी रुपये १,१०,३५६ आहे. यामध्ये दरवर्षी संस्थेच्या नवीन सेवकांना प्रवेश वर्गणी व कायम सभासदांना वार्षिक वर्गणीतून निधी संचय होतो. या निधीतून सेवकांना त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे आजारपण व तातडीच्या गरजासमयी आर्थिक सहाय्य केले जाते. या निधीचे ५०५ सेवक सभासद असून आजअखेर १३ सभासदांना याचा लाभ झालेला आहे.

११. इमारती व क्रीडांगणे - संस्थेच्या विविध इमारती व क्रीडांगणासाठी सुमारे ४४ एकरांची जागा असून संस्थेच्या मालकीच्या २३१ खोल्यांच्या एकूण १७ इमारती आहेत. इमारतीच्या बांधकामासाठी आजअखेर १ कोटी ३४



14764

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

लाख रुपये एवढा खर्च झालेला आहे. सध्या प्राथमिक शाळा कोथरुड, पुणे बी. एड्. कॉलेज, माळेवाडी, अकलूज, सदुभाऊ सांस्कृतिक भवन यांचे बांधकाम कार्यरत आहे. तसेच काही शाखांसाठी तेथील ग्रामपंचायतींनी आमदार फंडातून खोल्या बांधून दिलेल्या आहेत.

१२. भाडे पद्धतीच्या इमारती - संस्थेच्या २० शाखासाठी संस्थेच्या मालकीच्या इमारती नसल्याने विविध संस्था व व्यक्तींकडून संस्थेने २० इमारती भाडे पद्धतीने घेतल्या असून त्यासाठी संस्थेस सुमारे रु. ३ लाख १६ हजार भाडे दयावे लागत आहे.

१३. दुकानगाळे - अकलूज येथील संस्थेच्या जागेमध्ये २७ लाख ३० हजार रुपये खर्च करुन १०० अद्यावत दुकानगाळे बांधले आहेत. त्यापासून संस्थेस वार्षिक रुपये ५ लाख ३२ हजार भाडे मिळते. या उत्पन्नाचा उपयोग संस्थेच्या विस्तारकार्यासाठी केला जातो.

१४. सन १९९३-९४ मध्ये नवीन सुरु करण्यात आलेल्या शाखा

१) माध्यमिक विद्यालय, पळसमंडळ

२) विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, कोळेगाव

३) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अकलूज

अशाप्रकारे वेगवेगळ्या स्वरुपाचे उपक्रम राबवून सतत विधायक स्वरुपाचे कार्यक्रम हाती घेवून व संस्थेच्या शाखांची संख्या सतत वाढवून कै. शंकरराव मोहिते-पाटील यांची अमृतमहोत्सवी जयंती १९९३ साली साजरी केली. ती सर्वांच्या स्मरणात कायम राहील. कारण अशाप्रकारच्या भरगच्च कार्यक्रमांनी जयंती साजरी करण्यात आली होती.

**संस्थेच्या विविध शाखा**

शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर संस्थेच्या विविध शाखांची यादी खालीलप्रमाणे आहे.

**महाविद्यालये**

१. शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर (व्यवसाय, उच्च माध्यमिक व वरिष्ठ)

२. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३. नेताजी सुभाषचंद्र बोस शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

४. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

५. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

६. अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

७. कृषि महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

८. कै. सौ. अरुणादेवी देसाई अध्यापक विद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय**

१. सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२. सदाशिवराव माने विद्यालय, माणकी, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३. रामलिंग विद्यालय, कुरबावी, ता. माळशिरस, जि. सोलापूर

४. श्री बाणलिंग विद्यालय, फोंडशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर

५. श्री गणेश विद्यालय, पिंपळनेर, ता. माढा, जि. सोलापूर

६. महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर (माध्यमिक, उच्च माध्यमिक, तांत्रिक व व्यावसायिक)

७. कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय, सदाशिवनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

८. कृष्णानंद विद्यामंदिर, पाटीलवस्ती, ता. माळशिरस, जि. सोलापूर

९. मोरोची विद्यालय, मोरोची, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१०. श्री विजयसिंह मोहिते विद्यालय, वाघोली, ता. माळशिरस, जि. सोलापूर

११. जिजामाता कन्या प्रशाला, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१२. लक्ष्मीबाई कन्या प्रशाला, यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१३. रात्र प्रशाला, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१४. प्रतापसिंह मोहिते पाटील विद्यालय, शिवपुरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१५. माध्यमिक विद्यालय, लवंग, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१६. मोहनराव पाटील विद्यालय, बोरगांव, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१७. स. म. शंकरराव मोहिते पाटील विद्यालय, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर (माध्यमिक व उच्च माध्यमिक)

१८. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय, मांडवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

१९. श्री विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय, विझोरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२०. माध्यमिक विद्यालय, बोंडले, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२१. माध्यमिक विद्यालय, गुरसाळे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२२. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील कन्या प्रशाला, नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर (माध्यमिक व उच्च माध्यमिक)

२३. माध्यमिक विद्यालय, उंबरे दहिगांव, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२४. श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय, संग्रामनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२५. माध्यमिक विद्यालय, लोंढे मोहितेवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२६. माध्यमिक विद्यालय, चव्हाणवाडी पळसमंडळ, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२७. श्री विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय, कोळेगांव, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२८. श्री चक्रेश्वर माध्यमिक विद्यालय, चाकोरे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२९. माध्यमिक विद्यालय, इस्लामपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३०. श्री समर्थ रामदास विद्यामंदिर, शिवथर, ता. महाड, जि. रायगड

३१. अकलाई विद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३२. श्री सावता माळी विद्यालय, अकलूज, माळेवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३३. माध्यमिक विद्यालय, कोथरुड, जि. पुणे

३४. स. म. शंकरराव मोहिते पाटील विद्यालय, केगांव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

**पूर्वप्राथमिक व प्राथमिक शाळा**

१. सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक शाळा, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२. महर्षि शंकरराव मोहिते प्राथमिक शाळा, यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३. कृष्णानंद विद्यामंदिर प्राथमिक शाळा, पाटीलवस्ती, ता. माळशिरस, जि. सोलापूर

४. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक शाळा, नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर

५. स. म. शंकरराव मोहिते पाटील प्राथमिक शाळा, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

६. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्राथमिक शाळा, मांडवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर

७. श्री. जयसिंह मोहिते पाटील प्राथनिक शाळा, संग्रामनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

८. प्राथमिक शाळा, कोथरुड, जि. पुणे (पूर्व प्राथमिक व प्राथमिक)

**व्यवसाय अभ्यासक्रम**

१. पूर्व प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२. दुग्ध व्यवसाय व्यवस्थापन व पुशसंवर्धन अभ्यासक्रम, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३. कृषि विद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

४. सौंदर्यशास्त्र विद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

५. शिवण कर्तन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

६. शिवण कर्तन अभ्यासक्रम, नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर

७. महाराष्ट्र राज्य माहिती व तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**वसतिगृह**

१. विजय विद्यार्थी वसतिगृह, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

२. कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यार्थी वसतिगृह, मोरोची, ता. माळशिरस, जि. सोलापूर

३. कमला नेहरु मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर

४. शिवपार्वती मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

५. विश्वतेज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

६. शंकरराव मोहिते महाविद्यालय बॉईज हॉस्टेल, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**संस्था व्यवस्थापन**

संस्थेचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने संस्थेची सर्वसाधारण सभा, कार्यकारी मंडळ, शाखावार स्थानिक समिती, समन्वय समिती, खरेदी व शेती समिती, भांडार समिती, चौकशी व देखरेख समिती, सेवक कल्याण निधी समिती, परीक्षा समन्वय समिती या विविध समित्या अधिकारी मंडळाच्या निर्णयानुसार चालतात. दैनंदिन कामकाज सुव्यवस्थितपणे व्हावे या हेतूने या समित्या स्थापन केल्या आहेत. शाखा व संस्था यांचेमध्ये समन्वय रहावा तसेच शाखांच्या अडचणी सोडविण्याकरीता दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी सर्व शाखाप्रमुखांची सभा संस्था कार्यालयात आयोजित केली जाते. यामध्ये संस्थेचे मार्गदर्शक संचालक मा. ना. श्री. विजयसिंह मोहिते-पाटील तसेच संस्थेचे शिस्तप्रिय अध्यक्ष मा. श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व उपाध्यक्ष मा. श्री. चांगोजीराव आबासाहेब देशमुख व कार्यकारी मंडळातील सन्माननीय सदस्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सन २००३-०४ मध्ये कार्यकारी मंडळाच्या १९, शेती व खरेदी समितीच्या ४, भंडार समिती ९, समन्वय समितीच्या ३, बांधकाम समितीच्या ४, सेवक कल्याण निधी समितीच्या ३ शाखाप्रमुखांच्या सहविचार सभा ५ झालेल्या आहेत. संस्था चौकशी व देखरेख समितीची सभा झालेली नाही.[२१]

अशाप्रकारे व्यवस्थापनाचे कार्य सतत चालू असते.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**संस्थेचे नियोजित प्रकल्प**

१. इमारती - संस्थेच्या ज्या शाखा सध्या भाडे पद्धतीच्या इमारतीमध्ये भरत आहेत त्यांना संस्थेच्या मालकोच्या इमारती व क्रीडांगणे उपलब्ध करुन देणे.

२. संस्थेच्या मालकीच्या जिरायती शेतजमिनी बागायत करणे.

३. शाळा/महाविद्यालयासाठी स्वतंत्र व्यायामशाळा बांधणे.

४. आवश्यक तेथे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, व्यवसाय शिक्षणाचे अभ्यासक्रम, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नर्सिंग स्कूल, केटरिंग कॉलेज, अॅग्रीकल्चर कॉलेज, हॉर्टिकल्चर कॉलेज, डी. बी. एम., एम. बी. ए., एम. एस. डब्ल्यू., कृषि अभ्यासक्रम सुरु करणे.

५. मुलींच्या जिजामाता कन्या प्रशाला, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालय, अकलूज महाविद्यालयीन मुलींचे वसतिगृह या शाखांसाठी स्वतंत्र रत्नाई संकुलाची उभारणी करणे.[२२]

**संस्थेचे कार्यकारी मंडळ**

संस्थेचे कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा. ना. श्री. विजयसिंहजी शंकरराव मोहिते-पाटील | सदस्य |
| २ | मा. श्री. जयसिंहजी शंकरराव मोहिते-पाटील | अध्यक्ष |
| ३ | मा. श्री. चांगोजीराव आबासाहेब देशमुख | उपाध्यक्ष |
| ४ | मा. श्री. फत्तेसिंह व्यंकटराव माने-पाटील | सदस्य |
| ५ | मा. श्री. रणजितसिंह विजयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| ६ | मा. श्री. रघुनाथ रामचंद्र माने गुरुजी | सदस्य |
| ७ | मा. श्री. संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८ | मा. श्री. वेताळ गजाबा गायकवाड | सदस्य |
| ९ | मा. श्री. विनोदकुमार माणिकलाल दोशी | सदस्य |
| १० | मा. श्री. विजय लिलाचंद गांधी | सदस्य |
| ११ | मा. श्री. विजय विश्वनाथ शिंदे | सदस्य |
| १२ | मा. श्री. अशोक बाबुराव जावळे | सदस्य |
| १३ | मा. श्री. साहेबराव सुबराव देशमुख | सदस्य |
| १४ | मा. श्री. राजाभाऊ दशरथ लव्हाळे | सदस्य |
| १५ | मा. श्री. विजय तुकाराम माने | सदस्य |
| १६ | मा. श्री. अभिजित विजयसिंह रणवरे | सदस्य |

**समारोप**

कै. शंकरराव मोहिते-पाटील यांनी सर्वच क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. त्याचप्रमाणे शिक्षणक्षेत्रातही त्यांनी अगदी बालवाडी शिक्षणापासून ते विधापीठीय शिक्षणाची सोय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी केलेली आहे. त्यांनी १९४८ साली 'विजय वसतिगृहा'पासून आपल्या शैक्षणिक कार्याचा प्रारंभ केलेला दिसून येतो. तसेच त्यांनी स्थापन केलेली शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचा कल्पवृक्ष आज बहरलेला आहे असे दिसून येते. ग्रामीण जनतेची आर्थिक उन्नती होण्यासाठी शिक्षण हे झोपडीपर्यंत जाऊन पोहोचले पाहिजे असे शंकररावजींना नेहमी वाटत असे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी शिक्षणाच्या कामाला गती दिली. समाजकार्याला वाहून घेतलेल्या शंकररावांनी समाजाची खरी प्रगती शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही याची पक्की खूणगाठ मनाशी बांधली होती.

शंकररावजींना स्वतःला सातवीत असताना परीक्षेची फी भरायला गरिबीमुळे पैसे मिळाले नाहीत म्हणून शाळा सोडावी लागली याची त्यांना सदैव जाण होती. अशीच वेळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवरती येवू नये म्हणून त्यांनी शाळा सोडतानाच गुरुजींना आव्हान

दिले होते की मी अशा अनेक शाळा गरिबांसाठी काढेन. हा निश्चय मनामध्ये पक्का करुनच त्यांनी शाळा काढण्यासाठी अहोरात्र कष्ट सहन केले व त्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या व्यक्तींनी प्रोत्साहन व सहकार्य दिले. तसेच त्यांना त्यांचे सहकारी रघुनाथ माने गुरुजी व माणिकलाल शेठ यांच्यासारखे अनेक विश्वासू सहकारी यांनी सतत मदत केली आहे.

या प्रकरणामध्ये शंकरराव मोहिते-पाटील यांनी केलेले शैक्षणिक कार्याचा सखोल आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये त्यांनी 'विजय' वसतिगृहाची निर्मितीपासून सध्याची संस्थेची प्रगती व आढावा याचा उल्लेख केलेला आहे. या सर्व शैक्षणिक कार्याचा अभ्यास केला तर ते खऱ्या अर्थाने सहकारमहर्षि बरोबरच शिक्षणमहर्षिसुद्धा होते असे म्हटल्यास वावगे ठरु शकणार नाही.

## संदर्भ


१. रघुनाथ रामचंद्र माने गुरुजी स्मरणिका, १४ जानेवारी १९९३, पृ. ८८

२. उपरोक्त, पृ. ८८

३. शिक्षण प्रसारक मंडळ अहवाल, सन २००२-०३

४. प्रा. मोहनराव काळे, सहकारमहर्षि मोहिते-पाटील, पृ. २३

५. रघुनाथ माने गुरुजी स्मरणिका, १४ जानेवारी १९९३, पृ. ८८

६. प्रा. मोहनराव काळे, सहकारमहर्षि मोहिते-पाटील, पृ. २३

७. रघुनाथ माने गुरुजी स्मरणिका, १४ जानेवारी १९९३, पृ. ८९

८. श्री. सुभाष जगन्नाथ टेके, गोडवा (मासिक), फेब्रुवारी १९९३, पृ. ३७

९. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज अहवाल, १९९३-९४, पृ. ६९

१०. दिनकरराव माने, लोकराज्य, १६ जानेवारी १९९३, पृ. ३९

११. दिनकरराव माने, गोडवा (मासिक), फेब्रुवारी १९९३, पृ. ३४

१२. उपरोक्त, पृ. ३५

१३. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील अमृतमहोत्सवी जयंती सांगता समारंभ समिती, ११ फेब्रुवारी १९९४, पृ. २४

१४. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज अहवाल, १९९३-९४, पृ. २

१५. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील अमृतमहोत्सवी जयंती सांगता समारंभ समिती, ११ फेब्रुवारी १९९४, पृ. २५

१६. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज अहवाल, १९९३-९४, पृ. ३

१७. दिनकरराव माने, शंकरराव मोहिते-पाटील रौप्यमहोत्सवी स्मरणिका, १९६२-८७, पृ. ४३

१८. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज अहवाल, १९९३-९४, पृ. ५६

१९. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील अमृतमहोत्सवी जयंती सांगता समारंभ समिती, ११ फेब्रुवारी १९९४, पृ. २५, २६

२०. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज अहवाल, १९९३-९४, पृ. ९

२१. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज अहवाल, २००२-०३

२२. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज अहवाल, २००२-०३